स्वीयेत्तर सेवेत / शासनाच्या अन्य विभागात प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची वेतन निश्चिती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : वेतन-२०१७/प्र.क्र.४९/ई-११

मंत्रालय, १ ला मजला, हुतात्मा राजगुरु चौक,

मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २६ सप्टेंबर, २०१७.

<u>संदर्भ</u> :
1. **शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.: पीएवाय-२६९०/१०८७/ प्र.क्र.४८८५/ई-२, दिनांक २५.०९.१९९०.**
2. **शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.: वेतन-२००९ /प्र. क्र.२०७ / ई-२, दिनांक ०७.०७.२००९.**

<u>प्रस्तावना :-</u>

संदर्भ क्रमांक १ वरील परिपत्रकान्वये स्वीयेत्तर सेवेत काम करणाऱ्या उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची वेतननिश्चिती तसेच अशा अधिकाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ मंजूर करण्याबाबतची कार्यवाही संबंधित उपजिल्हाधिकारी प्रतिनियुक्तीपूर्वी ज्या विभागीय आयुक्तांच्या नियंत्रणाखाली काम करीत होते त्या विभागीय आयुक्तांनी करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, संदर्भ क्रमांक २ वरील परिपत्रकान्वये ६व्या वेतन आयोगानंतर स्वीयेत्तर सेवेत/शासनाच्या अन्य विभागात प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या अपर जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) या पदावरील अधिकाऱ्यांची वेतन निश्चिती महसूल व वन विभाग/ई-२ कार्यासनाकडून करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. प्रशासकीय सुसूत्रतेच्या दृष्टीने याकामी सुधारित निर्देश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

प्रशासकीय कामकाजात सुसुत्रता येण्यासाठी व सेवा विषयक अभिलेख अद्ययावत ठेवण्याच्या सोयीसाठी शासन आता असे निर्देश देत आहे की, महसूल व वन विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयातील स्वीयेत्तर सेवेत/शासनाच्या अन्य विभागात प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती उक्त अधिकारी/कर्मचारी स्वीयेत्तर सेवेत/शासनाच्या अन्य विभागात प्रतिनियुक्तीने जाण्यापूर्वी ज्या विभागीय आयुक्तांच्या नियंत्रणाखाली काम करीत होते त्या विभागीय आयुक्तांनी करावी.

सदर शासन निर्णय वित्त विभागाने अनौ. संदर्भ क्र.२२५/२०१७/कोशा.प्रशा-५, दिनांक २४.०८.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२६१७१७१५६४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशांनुसार व नांवाने,

Manu kumar srivastava
Digitally signed by Manu kumar srivastava
DN: cn=Manu kumar srivastava, o, ou=goverment of maharashtra, email=smanukr@ias.nic.in, c=IN
Date: 2017.09.28 13:42:19 +05'30'

(मनुकुमार श्रीवास्तव)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति :

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
८. महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
११. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१४. सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग (ई-१, ई-२, ई-३, ई-७ , ई-९ व ई-१०)
१५. उप सचिव, वित्त विभाग (कार्या. सेवा-३/ सेवा- ६ /कोषा. प्रशा- ५), मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती, महसूल व वन विभाग/ई-११.